Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 3 | Sept - 2015




# अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीचे समाजशास्त्रीय महत्त्व

**बालाजी पिडगे**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख , सहयोगी प्राध्यापक आदर्श महाविद्यालय, उमरगा**
**जि. उस्मानाबाद.**

**गोषवारा (Abstract): -**

*अण्णाभाऊ साठे हे विसाव्या शतकातील एक प्रतिभावंत मराठी साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी मराठी वाङ्‌मयातून विपूल स्वरूपाचे लेखन केले आहे. त्यांनी अनेक कथा, कादंब-या, कविता, तमाशे, लावण्या, पोवाडे, छक्कडे लिहिलेली आहेत. समताधिष्ठित समाज संरचना, वर्ग आणि जातीव्यवस्था नष्ट करणे आणि विनाशर्त मानवतेचा पुरस्कार हे त्यांच्या साहित्याचे मुख्य उद्दिष्ट होते. हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून पददलितांच्या व क ामगारांच्या तळहातावर तरलेली आहे हे त्यांच्या समग्र साहित्याचे अंत:सूत्र होते. विशेषत: अण्णाभाऊ साठे यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनावर आधारित अनेक कथा-कादंब-या लिहिल्या आहेत. 'वारणेच्या खो-यात' आणि 'मास्तर' या कादंब-यांतून समकालीन राष्ट्रीय स्वातंत्र्यआंदोलनाचे चित्रण करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या साहित्यात मार्क्सवादी विचारांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा अंगीकार केलेला दिसून येतो. वर्गव्यवस्थेबरोबरच जातीयव्यवस्थेविरुद्ध बंडखोर असे लिखान त्याच्या साहित्यात दिसून येते. अण्णाभाऊंचे साहित्य वाङ्‌मयिन दृष्टिकोनातून मोठ्याप्रमाणात अभ्यासलेले असले तरी त्यांच्या साहित्यात समाजशास्त्रीय समस्या कशा हाताळलेल्या आहेत हे अभ्यासने निश्चितच उपयुक्त ठरेल. म्हणून प्रस्तूत शोधनिबंधात त्यांच्या कादंब-यातील सामाजिक समस्यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

**काही संज्ञा:** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, कादंबरी, समाज परिवर्तन, समाजशास्त्रीय दृष्टिकोन इत्यादी.



**प्रस्तावना:**

अण्णाभाऊ साठे यांच्या बहुतांश कादंब-या ह्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात म्हणजे १९५० ते १९६० या दशकत लिहिलेल्या आहेत. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीच्या सुमारे १६ आवृत्त्या निघाल्या. या कादंब-यांवर आधारित चित्रपटही काढले गेले. त्यांच्या काही कादंब-या हिंदी व पंजाबी भाषेतही अनुवादित झाल्या आहेत. 'चित्रा' या कादंबरीचे कन्नड, रशियन, पोलिश भाषेत भाषांतर झाले आहे. प्रसिद्ध ललित साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्यानंतर अण्णाभाऊ साठे यांचा नंबर लागतो, त्यांचे साहित्य इतर भाषेमध्ये अनुवादित झालेले आहे. त्यांच्या काही कादंब-या रशियन विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमासाठी निवडण्यात आलेल्या आहेत. कादंब-यांबरोबरच त्यांनी अनेक पोवाडे, लोकनाट्ये, लधुकथा लिहिल्या आहेत ज्यामध्ये त्यांनी समाज परिवर्तनासाठी योग्य दिशा दाखविली आहे तसेच अनेक गंभीर स्वरूपाच्या सामाजिक समस्यांचा मार्गदर्शक रितीने उहापोह केला आहे. म्हणून खरोखरच त्यांच्या कादंबरीचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण होणे आवश्यक आहे.

अण्णाभाऊंनी सुरुवातीच्या काळात ज्या कादंब-या लिहिल्या त्या कादंब-यांमधील आशय हा सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी जो मार्ग दाखविलेला आहे त्यामध्ये मार्क्सवाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीची छटा दिसून येते. तसेच त्यामध्ये पराक्रम व साहसी नायकांचा उल्लेख आढळतो. कथानके ही सहसा स्वांतंत्रपूर्व काळातील समाजाविषयी असून त्यामध्ये दाखविलेला भौगोलिक परिसर हा दुष्काळी आहे व त्याचा सरळसरळ परिणाम अण्णाभाऊंच्या पात्रांवर झालेला दिसून येतो. अनिष्ट सामाजिक परंपराविरुद्ध संघर्ष करून त्या कशा बदलून टाकता येतील व सामाजिक परिवर्तन कसे घडवून आणता येईल याचे वाचकांना नक्कीच मार्गदर्शन त्यांच्या कादंब-यांमधून मिळते.

**उद्दिष्ट्ये:**

(१) अण्णाभाऊ साठे यांच्या कादंब-यांचे समाजशास्त्रीय महत्त्व स्पष्ट करणे.
(२) त्यांच्या कादंब-यातून सांगितलेला राष्ट्रीय स्वातंत्र्याचा आशय व समाज परिवर्तनाची दिशा कशी स्पष्ट झालेली आहे हे स्पष्ट करणे.

विषय चित्रणाच्या आधारावरून अण्णाभाऊ साठे यांच्या कादंब-यांची चार गटात वर्गीकरण करता येईल. वास्तविक वाङ्मयीन दृष्टिकोनातून या कादंब-यांचा अनेक प्रकारामध्ये समावेश होऊ शकेल. त्यांच्या विषयचित्रणावरून कादंब-यांचे चार गट असे पाडता येतील.

१) सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड व पराक्रमाच्या गाथा गाणा-या कादंब-याः वारणेच्या खो-यात (मंगला), फकिरा, धुंद, वारणेचा वाघ, अग्निदिव्य, मास्तर इत्यादी.
२) स्त्रियांच्या समस्या व्यक्त करणा-या कादंब-याः वैजयंता, चित्रा, फुलपाखरू, रत्ना, चिखलातील कमळ, चंदन, आवडी, टिळा लाविते मी रक्ताचा इत्यादी.
३) प्रेमकथायुक्त कादंब-याः रानगंगा, आग, रुपा, अलगूज, अहंकार, मूर्ती, मयुरा, आघात, गुलाम इत्यादी.
४) ग्रामीण जीवन व व्यवहाराचे चित्रण करणा-या कादंब-याः डोळे मोडीत राधा चाले, माकडीचा माळ, रानबोका, पाझर, वैर, केवड्याचं कणीस, कुरूप, पाझर इत्यादी.

**अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष व सामाजिक परिवर्तनाचा आशयः**

आता अणाभाऊ साठे यांच्या कादंब-यांचे समाज परिवर्तनविषयक तसेच स्वातंत्र्यसंग्राम विषयक आशय या बद्दल थोडक्यात आढावा घेऊ या.

### वारणेच्या खो-यातः

अण्णाभाऊ साठे यांची पहिली कादंबरी ‘वारणेच्या खो-यात’ ही सन १९५१ साली प्रसिद्ध झाली. हीच कादंबरी पुढे मंगला या नावाने प्रसिद्ध झाली. या कादंबरीचा नायक ज्याने १९४२ च्या ‘चले जाव’ या आंदोलनामध्ये भाग घेऊन हौतात्म्य पत्करले होते ते हिंदूराव ऊर्फ राजाराम पांडुरंग पाटील जावळेकर व त्याची प्रेयसी मंगला यांच्या शोकांतिकेचे चित्रण केलेले आहे. हिंदूरावाचे लग्न ठरलेले असताना, त्याचे वडील वार्धाक्याने थकलेले असताना तो राष्ट्रीय बाण्याने प्रेरित होऊन देशासाठी ब्रिटिशांविरोधातील लढ्यात भाग घेतो. त्याला या लढ्यात त्याला त्याची मंगला ही खंबीरपणे सहकार्य करते. इथे अगदी सामान्यातला सामान्य माणूस देखील कसा स्वातंत्र्य संग्रामामध्ये आपले योगदान देतो याचे दर्शन घडते.

### फकिराः

‘फकिरा’ ही कादंबरी मातंग समाजाचे व त्यांच्या साहसी वृत्तीचे जीवंत चित्रण आहे. डॉ. शरणकुमार लिंबाळे सांगतात, ‘फकिरा’ ही कादंबरी मुळातच मातंग समाजाचे साहसी दर्शन घडविण्यासाठी लिहिलेली दिसते.” त्यांच्या मते कादंबरीतील इतर पात्रे राणोजी, सावळा, दौलती, सई, राधा, सहदेव हे ही मातंग आहेत परंतु कोणाची जात वा धर्म माणसाला शौर्य व साहस प्रदान करीत नसते. ‘शौर्य व त्याग यांना कोणताही धर्म वा कोणतीही जात नसते. या कादंबरीमध्ये अण्णाभाऊ यांनी इतर जातीतील स्वभाव विशेष देखिल रेखाटले आहेत. त्यामध्ये विष्णुपंत कुलकर्णी, सत्तु भोसले, शंकरराव पाटील, तायनु महार, कोंडी महार, अशा विविध जातीतील व्यक्तिचित्रे या कादंबरीमध्ये रेखाटली आहेत. या मधून जात नावाची सामाजिक संस्था किती फोल आहे हे अण्णाभाऊ यांना सूचित करावयाचे आहे. हा त्यांचा सामाजिक परिवर्तनाचा आशय समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा वाटतो.

फकिरा ही कादंबरी अतिशय लोकप्रिय झालेली आहे. समाज परिवर्तनाबरोबरच यामध्ये अणाभाऊ साठे यांनी आपल्या मामाचा ब्रिटिशांबरोबरचा तसेच स्वकियांबरोबरचा संघर्ष मांडला आहे. यातील नायक फकिरा हा शौर्य, स्वाभिमान, बंडखोरपणा, गरजूंना मदत करण्याची वृत्ती इत्यादी गुणांनी युक्त असून सामान्य लोकांचा ख-या अर्थाने त्राता आहे असे दाखवले आहे. तो केवळ मागासवर्गीय मातंग सामाजातील तरुणाचे निदर्शक नाही तर तो समस्त दीन दलितांचा प्रतिनिधी म्हणून पाहावयास मिळतो. या कादंबरीवर चित्रपट ही काढला गेला असून महत्त्वाची बाब म्हणजे या कादंबरीला महाराष्ट्र राज्याचा साहित्य पुरस्कार देखील मिळाला आहे. त्यांच्या फकिरा या कादंबरीसह सर्वच कादंब-यांमध्ये सत्प्रवृत्तींचा विजय व असत्य प्रवृत्तींचा पराजय असे सूत्र आढळून येते.

### मास्तरः

त्यांची दुसरी एक कादंबरी मास्तर ही देखील अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. वास्तविक ही कादंबरी स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिलेल्या श्री बेर्डे गूरुजी यांच्यावर आधारित आहे. यामध्ये देवगावच्या एका बंडखोर, परंतु देशभक्त शिक्षकाचे जीवन चित्रित केलेले आहे.

### वारणेचा वाघः

या कादंबरीमध्ये कुमजातील गोरगरीबांची पिळवणूक करणा-या बदमाश सावकार व जमीनदार तसेच ब्रिटिशांच्या विरुद्ध सत्तू भोसलेने केलेल्या संघर्षाचे चित्रण करण्यात आले आहे. सत्तू भोसले व फकिरा हे दोन वेगवेगळया कादंब-यामध्ये वेगवेगळी पात्रे असून देखील या दोहोंमध्ये बरेच साम्य आढळून येते. त्याचे काही चित्रण फकिरा या कादंबरीमध्ये देखील सापडते; परंतु बहुधा अण्णांना सत्तू भोसलेचे जीवन हे कदाचीत कादंबरीचा विषय होऊ शकतो याची खात्री पटल्यावर मगच त्याच्यावर कादंबरी लिहिली असावी असे वाटते. सत्तूही फकिराप्रमाणेच परिस्थितीला शरण न जाता दरोडेखोर दाखविलेला आहे.

ब्रिटिशांनी सत्तूला गुन्हेगार करार केले असले तरी वारणा खो-यातील महिला त्याला भाऊ मानतात व त्याच्यासाठी परमेश्वराकडे साकडे घालताना दिसतात. सत्तूला गरिबांचा रखवाला व सावकार, भांडवलदार व जमीनदार यांचा कर्दनकाळ असे सुत्र या कादंबरीत दिसून येते. सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वर्गव्यवस्थेविरुद्ध दाखविलेला हा संघर्ष समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे.

### अग्निदिव्य

या कादंबरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती श्री प्रतापराव गुर्जर यांच्या जीवनाचे आणि त्यांच्या पराक्रमाचे दर्शन घडते. प्रतापरावांचे बहेलोल खान या आदिलशाहच्या सेनापतीशी झालेल्या संघर्षाचे चित्रण या कादंबरीमध्ये दिसते. बहेलोल खान पळून जातांना त्याला मारण्याच्या प्रयत्नात प्रतापरांवानाच मरण येते.

या ऐतिहासिक कादंबरीमध्ये वर नमूद केलेल्या कादंब-यांमध्ये समाज परिवर्तनाचे, साहसाचे तसेच पराक्रमाचे वर्णन आढळते. याबरोबरच अण्णाभाऊ साठे यांनी दलित स्त्रियांच्या समस्यांवर प्रकाश टाकणा-या कादंब-या देखील लिहिल्या आहेत.

### चित्राः

या कादंबरीमध्ये दलाल हे वेश्यांना शरीरविक्रीच्या व्यवसायात कसे फसवतात याचे दृश्य रेखाटलेले आहे. अण्णाभाऊंनी हे अनेक अनौपचारिक बैठकींमध्ये सांगितले आहे की या कादंबरीतील कथा ही सत्यकथा आहे. ब्रिटिश काळात मुंबई हे शहर औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले असले तरी त्यात समाजाला अनेक प्रश्नांनी ग्रासलेले आहे. त्यामध्ये निष्पाप स्त्रियांचा कसा बळी जातो हे या कादंबरीमध्ये स्पष्ट केलेले आहे.

### वैजयंता

अण्णाभाऊ साठे मुळातच तमाशातील कलावंताचे नातेवाईक, तमाशातील लोकगायक तसेच समग्र तमाशा-संस्कृतीचे चिंतक, अभ्यासक, मार्गदर्शक होते. त्यामुळे त्यांना तमाशातील कलावंतांच्या समस्यांची चांगली जाणीव होती. तमाशातील कलावंतांचे शोषण कसे होते याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच ते तमाशातील शोषित स्त्रियांचे दुःख व तमाशातील मागील पिढ्यांचे दुःख प्रभावीपणे मांडण्यात यशस्वी ठरले आहेत. श्रीमती जयश्री सगर याबद्दल सांगतात, "'वैजयंता' ही कादंबरी मध्ये अण्णाभाऊ साठे यांची तमाशा, तमाशा-संस्कृती, तमाशैतील पुरूष कलावंत, तमाशातील स्त्री कलावंत, बालकलाकार, तमाशातील रंजनप्रधान काम करणारे पुरूष, तमाशा कलावंतांच्या कलेवर गर्भश्रीमंत होणारे ठेकेदार, मालकाच्या आधाराने तमाशातील शरीरी आणि अशरीरी पातळीवरचे शोषण करणारे मुनीम, तमाशा पाहणारे हौशी प्रेक्षक, धनिक लोक, तमाशातील पैज लावणारे, तमाशात गाणे तोडणारे, तमाशात अत्यंत रसिकतेने कलास्वाद घेणारे आणि तमाशाच्या नावावर तमाशातील स्त्री कलावंतांकडे शारीरिक भावनेने आकृष्ठ होणारे आणि केवळ तमाशाकडे तमाशा म्हणूनच पहाणारे प्रेक्षक त्यांचे वर्गीकरण, त्यांची संस्कृती, त्यांची अभिरूची, त्यांचे संस्कार, त्यांची कौटुंबिक स्थिती, त्यांचे तत्कालीन समाजव्यवस्थेतील स्तररचनेनुसार स्थान याचे अत्यंत तादात्म्यतेने आणि तटस्थपणाने अण्णाभाऊ यांनी चित्रण केले आहे."

### निष्कर्षः

१) अण्णाभाऊ साठे यांच्या सर्वच कादंब-यांमध्ये सत्प्रवृत्तींचा विजय व असत् प्रवृत्तींचा पराजय असे सूत्र आढळून येते.

२) कादंब-यांबरोबरच अण्णाभाऊ साठे यांनी अनेक पोवाडे, लोकनाट्ये, लघुकथा लिहिल्या आहेत ज्यामध्ये त्यांनी समाज परिवर्तनासाठी योग्य दिशा दाखविली आहे तसेच अनेक गंभीर स्वरूपांच्या सामाजिक समस्यांचा मार्गदर्शक रितीने उहापोह केला आहे. म्हणून खरोखरच त्यांच्या कादंबरीचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण होणे आवश्यक आहे.

३) समाजपरिवर्तनाबरोबरच यांमध्ये अणाभाऊ साठे यांनी आपल्या मामाचा ब्रिटिशांबरोबरचा तसेच स्वकियांबरोबरचा संघर्ष मांडला आहे.

४) सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वर्गव्यवस्थेविरुद्ध दाखविलेला कादंब-यांमधील संघर्ष समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे.

**संदर्भ ग्रंथः**


१) गुरव बाबुराव (१९९१): अण्णाभाऊ साठेः समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय संग्रह, मुंबई.

२) डांगळे अर्जून (संपा.) (२००१): लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

३) भालसिंग वैशाली (२००६): फकिराः एक आकलन

४) अस्मितादर्शः १९६९, मुंबई

५) विचारक्रांतीः १९७७, पुणे (संपादक यशवंत मनोहर)